# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# पुणे विभागीय मंडळ, पुणे ४११ ००५.

तातडीचे / महत्वाचे

क्रमांक पुविमं / माध्यमिक–क / 1727
पुणे–411005.
दिनांक–13 / 07 / 2022.

प्रति,
मुख्याध्यापक / प्राचार्य
सर्व माध्यमिक शाळा / विद्यालय
पुणे,अहमदनगर,सोलापूर .

विषय–जुलै–ऑगस्ट, 2022 च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10 वी) परीक्षेच्या ऑनलाईन प्रवेशपत्र व त्यामधील दुरूस्त्यांबाबत. .....

संदर्भ– 1 क्रमांक रां.मं. / परीक्षा–7 / 3333 पुणे–4 दि.12 / 07 / 2022 चे पत्र

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सर्व माध्यमिक शाळा मुख्याध्यापकांना कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) परीक्षेची ऑनलाईन प्रवेशपत्रे (Hall Ticket) उपलब्ध करून देण्यात येत आहेत. सदर परीक्षेची सर्व माध्यमिक शाळांना जुलै–ऑगस्ट 2022 च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) परीक्षेची प्रवेशपत्रे(Hall Ticket) ऑनलाईन (Online)पध्दतीने मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर गुरूवार,दिनांक 14 / 07 / 2022 रोजी सकाळी 11.00 वाजल्यापासून School Login मध्ये download करण्याकरिता उपलब्ध करून देण्यात येत आहेत.त्यानुसार प्रचलित पध्दतीने ते उपलब्ध करून घेण्याची कार्यवाही करण्यात यावी. या संदर्भात काही तांत्रिक अडचण उदभवल्यास माध्यमिक शाळांनी विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा.

ऑनलाईन प्रवेशपत्रे (Hall Ticket) उपलब्ध करून घेण्याच्या अनुषंगाने सुचित करण्यात येते की,

1. जुलै –ऑगस्ट 2022 साठी मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळांनी इ.10 वी परीक्षेची ऑनलाईन प्रवेशपत्रे प्रिंट करून विद्यार्थ्यांना द्यावयाची आहेत.
2. प्रवेशपत्र(Hall Ticket) ऑनलाईन (Online) पध्दतीने प्रिंटिंग करताना विद्यार्थ्याकडून त्यासाठी कोणतेही वेगळे शुल्क घेवू नये. सदर प्रवेशपत्राची प्रिंट काढून त्यावर मुख्याध्यापकांचा शिक्का मारून स्वाक्षरी करावी.
3. प्रवेशपत्रावरील (Hall Ticket) फोटो,स्वाक्षरी,विद्यार्थ्याचे नाव,जन्मतारीख व जन्मस्थळ या संदर्भातील दुरूस्त्या माध्यमिक शाळांनी त्यांच्या स्तरावर करून त्यांची एक प्रत विभागीय मंडळाकडे त्वरित पाठवावयाची आहे.
4. प्रवेशपत्र विद्यार्थ्यांकडून गहाळ झाल्यास संबधित माध्यमिक शाळांनी पुनःश्च प्रिंट काढून त्यावर लालशाईने द्वितीय प्रत (Duplicate)असा शेरा देवून विद्यार्थ्यास प्रवेशपत्र द्यावयाचे आहे.
5. फोटो सदोष असल्यास त्यावर विद्यार्थ्याचा फोटो चिकटवून त्यावर संबधित मुख्याध्यापकांनी शिक्का मारून स्वाक्षरी करावयाची आहे.

सदरच्या प्रवेशपत्रांमधील विद्यार्थ्यांच्या माहितीची पडताळणी करण्यात यावी. त्यामध्ये <u>नाव,जन्मतारीख,विषयामध्ये सूट / प्रविष्ठ अथवा अन्य बाबीमध्ये काही दुरूस्ती असल्यास त्या प्रचलित पध्दतीने विहित नमुन्यातील तक्त्यात भरून शुल्कासह मंडळास गुरूवार दिनांक–21 / 07 / 2022 पर्यंत मंडळाकडे समक्ष सादर करावयात</u>, विषयातील दुरूस्तीकरीता यापुर्वी दिलेल्या परीक्षांच्या गुणपत्रिकांची छायांकित प्रती प्रमाणित करून सोबत जोडाव्यात. विषयातील दुरूस्ती मंडळास समक्ष सादर न कळविल्यास त्यामुळे विद्यार्थ्यास परीक्षा केंद्रावर प्रश्नपत्रिका उपलब्ध होणेस अडचण होवू शकते. त्यामुळे विद्यार्थ्याचे संभाव्य नुकसान झाल्यास शाळाप्रमुखांना जबाबदार धरण्यात येईल. याची नोंद घ्यावी.सदर विषय दुरूस्तीसंबधीची माहिती संबधित परीक्षा केंद्रसंचालकांना समक्ष सादर करण्यात यावी.

अतिविलंबाने आवेदनपत्र सादर केलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्राची छायाप्रत संबधित परीक्षा केंद्रसंचालकांना परीक्षा सुरू होणेपुर्वीच्या दोन दिवस अगोदर हस्तपोहोच सादर करावी.त्यामुळे विद्यार्थ्यांची केंद्रावर बैठक व्यवस्था करणे सुलभ होईल. तसेच विद्यार्थ्यांना प्रात्याक्षिक परीक्षेबाबत योग्य त्या सूचना द्याव्यात.

तरी जुलै–ऑगस्ट 2022 मध्ये माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10 वी)परीक्षेसाठी प्रविष्ठ झालेले सर्व विद्यार्थी,पालक, शिक्षक,मुख्याध्यापक सर्व माध्यमिक शाळा यांनी उपरोक्त बाबींची नोंद घेवून त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

सोबत –प्रवेशपत्र दुरूस्तीकरीता विहित तक्ता

(अनुराधा ओक)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे–411005.

प्रत 1.केंद्रसंचालक, योग्य त्या कार्यवाहीसाठी
2.प्रत माहितीसाठी शिक्षणाधिकारी(माध्यमिक) जिल्हा परिषद पुणे,अहमदनगर,सोलापूर

१०७ prakatan

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा जुलै-ऑगस्ट - २०२२ शाळा सांकेतांक -

प्रवेशपत्रामधील दुरुस्ती कळविणेबाबत संकलित तक्ता

| SR. NO | SEAT NO. | विद्यार्थ्याचे नाव NAME OF CANDIDATE IN ENGLISH | प्रवेशपत्रातील मूळ स्थिती INCORRECT POSITION | आवश्यक दुरुस्ती (IN CAPITAL LETTERS ONLY) CORRECT POSITION |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |
| ६ | | | | |
| ७ | | | | |
| ८ | | | | |
| ९ | | | | |
| १० | | | | |

टिप- सदर यादीत नमूद केलेल्या प्रत्येक बैठक क्रमांकाच्या प्रवेशपत्राची छायांकित प्रत (लाल शाईने दुरुस्ती केलेली) जोडण्यात यावी. सदर दुरुस्त्या संगणकावर टाईप करुन सादर कराव्यात. तसेच नावात दुरुस्ती असेल तर ज्या नावात दुरुस्ती असेल त्या नावाचाच उल्लेख (आवश्यक दुरुस्ती या रकान्यात) करण्यात यावा. संपूर्ण नाव लिहिण्यात येवू नये

ठिकाण -

दिनांक - / /२०२

मुख्याध्यापक

सही व शिक्का